**ठळक बातम्या**

- रेल्वे पोलीस दलातली पदं यापुढे कर्मचारी निवड आयोगाद्वारे भरण्यात येतील, अशी रेल्वे मंत्र्यांची घोषणा
- बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीची अधिसूचना जारी/ भाजपाची पहिली उमेदवार यादी आज संध्याकाळी जाहीर होणार
- महाविकास आघाडीत मनसेला सामावून घ्यायला मुंबई काँग्रेसचा विरोध

**आणि**

- नैऋत्य मौसमी पावसाची राज्यातून पूर्णपणे माघार

**<><><><><>**

आरपीएफ अर्थात रेल्वे पोलीस दलातल्या पदांसाठी यापुढे कर्मचारी निवड आयोगाद्वारे भर्ती केली जाईल, अशी घोषणा रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. गुजरातमध्ये वलसाड इथे रेल्वे पोलीस दलाच्या एकेचाळीसाव्या स्थापना दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी आरपीएफशी संबंधित विविध उपक्रमांचा प्रारंभ केला. रेल्वे पोलीस कर्मचाऱ्यांकडे आता अतिउच्च फ्रिक्वेंसी असलेली उपकरणं दिली जातील, तसंच त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी त्यांना प्रगत डिजिटल आणि ड्रोन प्रशिक्षण दिलं जाईल, अशी घोषणाही रेल्वे मंत्र्यांनी यावेळी केली....

**होल्ड- रेल्वेमंत्री**

येत्या दिवाळी आणि छट पूजेसाठी रेल्वे १२ हजार विशेष गाड्या चालवणार असल्याची माहितीही वैष्णव यांनी दिली.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीची अधिसूचना आज जारी झाली. या टप्प्यात, २० जिल्ह्यांमधल्या १२२ विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला पाररंभ झाला असून त्याची मुदत २० ऑक्टोबर पर्यंत आहे. २१ ऑक्टोबरला अर्जांची छाननी होईल, तर २३ऑक्टोबर पर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. या टप्प्यासाठी ११ नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

<><><><><>

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाची पहिली उमेदवार यादी तयार झाली असून आज संध्याकाळपर्यंत ती जाहीर होईल असं बिहार भाजपा प्रधेशाध्यक्ष डॉ. दिलीप जयस्वाल यांनी सांगितलं. ते आज पाटणा इथं पत्रकारपरिषदेत बोलत होते. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे इतर घटक पक्ष देखील आज उमेदवार यादी जाहीर करतील असं जयस्वाल म्हणाले. प्रतिस्पर्धी महाआघाडीच्या जागवाटपाबाबत वाटाघाटी सुरु असून लौकरच काँग्रेसची यादी जाहीर होईल असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष राजेश राम यांनी सांगितलं. तर तिकिटवाटपाबाबत मतभेदाचे मुद्दे निकाली निघाल्याचं राजद नेता संजय यादव यांनी सांगितलं.

<><><><><>

देशातल्या ८ विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीची अधिसूचनाही आज जारी झाली. राजस्थान, झारखंड, पंजाब, तेलंगण, मिझोरम, आणि ओदिशा या ६ राज्यातल्या प्रत्येकी एका विधानसभा मतदारसंघात तसंच जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेशातल्या दोन विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुका होणार असून त्यासाठी ११ नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

<><><><><>

आयआरसीटीसी घोटाळ्यात राजदचे अध्यक्ष लालू प्रसाद यादव, त्यांच्या पत्नी राबडी देवी, मुलगा तेजस्वी यादव यांच्यावर दिल्लीच्या राऊज एव्हेन्यू

न्यायालयाने आरोप निश्चित केले आहेत. विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी या तिघांसह अन्य आरोपींवर भ्रष्टाचार, गुन्हेगारी कट आणि फसवणुकीचे आरोप निश्चित केले आहेत.

रेल्वेमंत्री असताना लालू प्रसाद यादव यांनी आणि त्यांच्या कुटुंबाने २००४ ते २००९ दरम्यान एका खासगी कंपनीला कंत्राट देण्यासाठी जमिनीच्या स्वरुपात लाच स्वीकारल्याचा आरोप सीबीआयने केला आहे.

<><><><><>

पीएम गतिशक्ती योजनेमुळे मोठ्या प्रमाणावर नियोजन आणि सूक्ष्म स्तरावर अंमलबजावणी शक्य झाल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. या योजनेला ४ वर्षं पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या योजनेमधून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची दूरदृष्टी दिसून येते असं ते म्हणाले. गेल्या ४ वर्षात पीएम गतीशक्ती विविध क्षेत्रात पोहोचली असल्याचं गोयल म्हणाले. यावेळी पीएम गतिशक्ती च्या ४ नवीन उपक्रमांचं उद्घाटन गोयल यांनी केलं.

<><><><><>

वाहतुकीच्या बहुस्तरीय जोडणीसाठी सुरू केलेल्या प्रधानमंत्री गतिशक्ती राष्ट्रीय योजनेला आज चार वर्षं पूर्ण होत आहेत. विविध आर्थिक क्षेत्रांना बहुस्तरीय वाहतूक जोडणी उपलब्ध व्हावी यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी १३ ऑक्टोबर २०२१ ला या योजनेचं उद्घाटन केलं होतं.

<><><><><>

महाविकास आघाडीत मनसेला सामावून घ्यायला काँग्रेसनं विरोध केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज मुंबईत काँग्रेस पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यात मुंबई महापालिकेची निवडणूक एकट्यानं लढवण्याची मागणी नेत्यांनी एकमतानं केली. कुठल्याही जागेवर मैत्रीपूर्ण लढत करण्याचा काँग्रेसचा विचार नसल्याचं मुंबई प्रदेशाध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी या

बैठकीनंतर वार्ताहरांना सांगितलं. मनसेच्या युतीसंदर्भात पक्ष श्रेष्ठींना भूमिका कळवणार असल्याचं काँग्रेस नेत्यांनी सांगितलं.

<><><><>

उत्पादन केंद्रीत अर्थव्यवस्था असेल तरच भारत विकसित देश बनू शकतो असं प्रतिपादन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केलं आहे. विकसित भारत बिल्डथॉनचं उद्घाटन केल्यानंतर आज ते बोलत होते.

शालेय स्तरावर 'विकसित भारत बिल्डथॉन २०२५' ही हॅकेथॉन स्पर्धा, आज रात्री ११ वाजेपर्यंत होणार आहे. देशभरातल्या शाळांमधून इयत्ता ६वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना त्यांची सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य दाखवण्यासाठी सक्षम बनवणं हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यावर्षीची स्पर्धा, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी, व्होकल फॉर लोकल आणि समृद्ध भारत या चार संकल्पनांवर आधारित आहे. या स्पर्धेत, राष्ट्रीय स्तरावर १०, राज्यस्तरावर १०० आणि जिल्हास्तरावर १ हजार विजेत्यांना एकंदर १ कोटी रुपयांची पारितोषिकं देण्यात येणार आहेत.

<><><><>

देशाच्या ईशान्य भागातली आठही राज्यं महत्त्वाची असून भाषा आणि संस्कृती वेगळी असूनही या राज्यांनी एकतेचा संदेश दिल्याचं प्रतिपादन रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. ते काल नागपूर इथे आयोजित नॉर्थ इस्ट ऑक्टेव्ह महोत्सवाच्या समारोपावेळी बोलत होते. आपल्या कार्यकाळात ईशान्य भारतातल्या राज्यांमध्ये ३ लाख कोटी रुपयांच्या रस्त्यांची विकासकामं झाली. तसंच, काझीरंगा ते नुमालीगड दरम्यान उन्नत महामार्ग तयार होत असल्याची माहिती गडकरी यांनी यावेळी दिली. या कार्यक्रमात संपूर्ण महोत्सवाचे संयोजक तरुण प्रधान आणि बांबू शिल्प कलावंत मुकेश सायकिया यांचा गडकरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

<><><><><>

प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेता आणि राजकीय नेता विजय यांच्या करूर इथल्या जाहीर सभेत झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणाची चौकशी सीबीआयमार्फत करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले. तामिळनाडूत करूर इथं गेल्या २७ सप्टेंबरला विजय यांच्या तमिळगा वेत्री कळगम- TVK पक्षाच्या जाहीर सभेच्या ठिकाणी झालेल्या चेंगराचेंगरीत ४१ जणांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणाची चौकशी विशेष तपास पथकाकडून करण्याचे आदेश मद्रास उच्च न्यायालयानं दिले होते. या आदेशाला TVK पक्षानं सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं.

सीबीआयतर्फे चालणाऱ्या तपासावर देखरेख ठेवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अजय रस्तोगी यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय समिती नेमण्याचे आदेशही न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठानं दिले. या समितीत तामिळनाडूचे रहिवासी नसलेल्या २ आयपीएस अधिकाऱ्यांचा समावेश असावा, असंही सर्वोच्च न्यायालयानं सांगितलं आहे.

<><><><><>

महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल विशाखापट्टणम मध्ये झालेल्या चुरशीच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा पराभव केला. भारताने प्रथम फलंदाजी करताना ३३० इतकी मोठी धावसंख्या उभारली. स्मृती मानधनाने ६६ चेंडून ८० धावा फटकावत कारकीर्दीतला ५ हजार धावांचा टप्पा पार केला. एक दिवसीय सामन्यांमध्ये, एकाच वर्षात १ हजार धावा पूर्ण करत तिने विक्रम नोंदवला. भारतानं दिलेलं ३३१ धावांचं आव्हान ऑस्ट्रेलियानं तीन खेळाडू राखून पूर्ण केलं.

<><><><><>

मलेशियात जोहोर बहरू इथं सुरू असलेल्या, सुलतान जोहोर कप कनिष्ठ पुरुष हॉकी स्पर्धेत काल भारताने न्यूझीलंडचा ४-२ असा पराभव केला. भारताकडून

अर्शदीप सिंग, पीबी सुनील, अराईजित सिंग हुंडल आणि रोशन कुजूर यांनी प्रत्येकी एक गोल केला. भारताचा सामना उद्या पाकिस्तानविरुद्ध होणार आहे.

**<><><><><>**

नैऋत्य मौसमी पावसानं राज्यातून पूर्णपणे माघार घेतली असल्याचं हवामान विभागानं जाहीर केलंय. राज्यातला मान्सूनचा माघारीचा प्रवास आज पूर्ण झाला. आता केवळ दक्षिण भारत आणि ओडिशातून मान्सूनची माघार शिल्लक आहे.

राज्यात येत्या १५ ते १८ ऑक्टोबर दरम्यान विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात वातावरण ढगाळ राहील, आणि दुपार नंतर वादळी पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**//<><><><><>//**